# ई - पोलीस पत्रिका

दि.१९/०५/२०२३            अनु.क्र.८६

## (अमरावती शहर पोलीसांची २०२३ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीसदल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीसकोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्यकरू.

## भाग-१

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## नेमणुक/भरती

**१.पोआअ/आस्था-प्रलि/पोशि भरती २०२१-नियुक्ती/५६५०/२०२३ अमरावती शहर दिनांक १६/०५/२०२३**

### नियुक्ती आदेश

महाराष्ट्र राज्य पोलीस दलात पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवर पोलीस शिपाई यांची रिक्त पदे भरण्याकरीता महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील तरतुदीनुसार **"पोलीस शिपाई" (गट-क, अराजपत्रीत)** पदाची पोलीस भरती २०२१ ची प्रक्रिया राबविण्यात आली आहे. पोलीस शिपाई भरती २०२१ मध्ये पोलीस शिपाई पदावर निवड झालेले खालील नमुद उमेदवार **चारीत्र्य पडताळणी व वैद्यकिय तपासणीमध्ये** पात्र ठरल्याने त्यांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गामध्ये व महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, २०१९ अन्वये वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर एस-७ :- २१७००-६९१००, अधीक विशेष वेतन रुपये ७५०/- (महागाई भत्ता व लागु असलेले इतर भत्त्यासह) मध्ये **"पोलीस शिपाई"** पदी मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१, प्रशासन) मधील नियम ३३ मध्ये असलेल्या अधिकारानुसार **निव्वळ तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन नियुक्ती देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | चेस्ट क्रमांक | नियुक्तीचा प्रवर्ग | बक्कल क्रमांक | नियुक्ती पासुन देय वेतन | नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.सागर रविंद्र इंगळे | १०६९ | **अनु.जाती** | ३४१ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |
| २. | श्री.सुभाष रंगराव असोले | १४५५ | **अनु.जमाती** | ३८६ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |
| ३. | श्री.शुभम बाबुराव व्यवहारे | १०२५ | **भटक्या जमाती-ब** | ३९१ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |
| ४. | श्री.रविकिरण केशव केंद्रे | १४५० | **भटक्या जमाती-ड** | ४०७ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |
| ५. | कु.प्रियंका बबन सानप | १५४८ | **भटक्या जमाती-ड /महिला** | ४२० | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |
| ६. | श्री.अक्षय सुनिल | ११५४ | **ईडब्ल्युएस** | ४२३ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | दिक्षित | | | | | |
| ७. | श्री.बालाप्रसाद माणिका लोहकरे | १११६ | **ईडब्ल्युएस** | ४२४ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |
| ८. | कु.सखुबाई कामाजी खैरे | १३९० | **ईडब्ल्युएस/ महिला** | ४३५ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |
| ९. | कु.निखीता विनोद वाळे | १५२१ | **ईडब्ल्युएस/ महिला** | ४८२ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |
| १०. | श्री.उमेश रामेश्वर शिंदे | ११७५ | **ईडब्ल्युएस** | ४८३ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |
| ११. | श्री. प्रविण गोरख**नेमणुक** पवार | १२५६ | **ईडब्ल्युएस** | ४९० | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |
| १२. | श्री.ओंकार रामेश्वर पन्हालकर | १२६२ | **ईडब्ल्युएस** | ४९३ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |
| १३. | श्री.अफरोजखान शफीकखान पठाण | १२८६ | **ईडब्ल्युएस** | ५०० | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |
| १४. | कु.भाग्यश्री भास्कर नरोडे | १४२६ | **ईडब्ल्युएस/ महिला** | ५०५ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |
| १५. | श्री.भगवान त्र्यंबक सहाने | १५३७ | **ईडब्ल्युएस/ होमगार्ड** | ५०६ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |
| १६. | कु.ऋतुजा भालचंद्र पवार | १४६२ | **ईडब्ल्युएस/ महिला** | ५१४ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |
| १७. | कु.कोमल आप्पाराव काकडे | १४२३ | **ईडब्ल्युएस/ महिला** | ५१७ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |
| १८. | श्री.अब्दुल राजीक अब्दुल सलाम | १६७१ | **ईडब्ल्युएस/ माजी सैनिक** | ५१८ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पोलीस मुख्यालय, अमरावती शहर |

**सदर नियुक्ती खालील अटी व शर्तीच्या अधिन राहील:-**

१) उपरोक्त नमुद उमेदवारांना महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व वेळोवेळी सेवाप्रवेश नियम २०११ मध्ये झालेल्या सुधारणेच्या संपुर्ण तरतुदी लागु राहतील. उमेदवारांची नियुक्ती पुर्णत: अस्थायी स्वरुपाची राहील. तसेच उमेदवारांची अर्हता व उमेदवाराने सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या आधारे पोलीस शिपाई पदावर निवड करण्यांत आलेली आहे. त्यामुळे पोलीस भरतीच्या वेळी सादर केलेली विविध प्रमाणपत्रे, गुणपत्रिका बनावट/खोटे असल्याचे भविष्यात आढळून आल्यास तसेच कोणतीही अनर्हता आढळून आल्यास शासकीय सेवा पुर्व सूचना न देता किंवा कोणतेही कारण न दर्शविता समाप्त करण्यांत येईल. याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ तरतुदीनुसार **राज्य शासनाच्या सेवेत दिनांक ०१ नोव्हेंबर २००५ किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना नविन "परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना आता सुधारीत राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना" लागु ठरेल.** मात्र, सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना १९९८ लागु होणार नाही. तसेच वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४ दिनांक ३१ मार्च २०२३ तरतुदीनुसार परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचा-याचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यु उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृति उपदान तसेच शासन सेवेतुन निवृत्त होणा-या कर्मचा-यांना सेवा उपदान अनुज्ञेय राहील.

३) पूर्व चारित्र व वर्तणुक पडताळणी बाबत भरुन दिलेला साक्षांकन फॉर्म मध्ये खोटी माहिती पुरविलेली आहे किंवा वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडवुन ठेवल्याचे सेवाकाळात कधीही निदर्शनास आल्यास तसेच आपले विरुध्द फौजदारी खटले न्याय प्रविष्ठ आहेत किंवा

नैतीक अंध:पतनाच्या गुन्हयात आपणास दोषी ठरवुन न्यायालयाने शिक्षा दिल्याचे किंवा पोलीस सेवेत अभियोग्य नसल्याचे आढळुन आल्यास किंवा इतर मार्गाने निदर्शनास आल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता आपली पोलीस शिपाई पदावरील सेवा समाप्त करण्यात येईल व आपणाविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

४) तुम्हास देण्यात आलेली नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या व हंगामी स्वरुपाची असुन तुम्हास कोणत्याही प्रकारची पुर्वसुचना अथवा नोटीस न देता सेवेतुन कमी करण्यात येईल.

५) पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारास या पदासाठी विहीत केलेले मुलभुत प्रशिक्षण पुर्ण करावे लागेल व संबंधीत परिक्षा चार संधीमध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल. जर चार संधीमध्ये आपण परिक्षा उत्तीर्ण झाला नाही तर आपली सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही. वार्षिक वेतनवाढ रोखलेले उमेदवार संबंधीत परिक्षा विहीत संधित उत्तीर्ण झ ाल्यास, राखुन ठेवलेली वेतनवाढ त्यास देय होईल. परंतु वेतनवाढ रोखुन धरल्यामुळे देय होणारी थकबाकी मिळण्याचा हक्क असणार नाही.

६) प्रशिक्षणाच्या कालावधीत शिस्त ही अत्यंत उच्च दर्जाची राहील. वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन काटेकोरपणे होईल याची दक्षता बाळगावी. प्रशिक्षण कालावधीत गैरशिस्तीचे वर्तन किंवा असभ्य वर्तन आढळुन आल्यास त्वरीत सेवेतुन कमी करण्यात येईल. प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारच्या रजा मिळणार नाही तसेच सक्षम अधिकाऱ्यांच्या परवानगी शिवाय मुख्यालय परिसर सोडुन बाहेर जाता येणार नाही.

७) हिंदी आणि मराठी भाषा परिक्षेसंबंधीच्या नियमावलीनुसार जर त्यांनी या परिक्षा अगोदरच उत्तीर्ण केल्या नसतील किंवा त्या उत्तीर्ण होण्यापासुन त्यांना सुट मिळाली नसेल तर त्यांनी एतदर्थ मंडळाची मराठी / हिंदी विषयांची परिक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. अन्यथा तद्नंतर त्यांच्या पुढील वेतनवाढी रोखुन ठेवण्यात येईल.

८) शासन अधिसुचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र. (१७/२०००)/बारा, दिनांक २८ मार्च २००५ चे महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ तरतुदीनुसार आपणास दिनांक २८ मार्च २००५ रोजी किंवा त्यानंतर हयात असलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत नमुना-अ नुसार विहीत प्रतिज्ञापन भरुन दयावे लागेल तसेच हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक आढळुन आल्यास राज्य शासकिय सेवेच्या पदासाठी अनर्ह ठरविण्यात येवुन सेवेतुन कमी करण्यात येईल.

९) गृह विभाग शासन पत्र क्र. पीएसबी-०३११/प्र.क्र.५२१/पोल-५ अ, दिनांक २६.०९.२०११ व अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. प्रशि/पोशि-भरती/प्रशि-खर्च वसुली/२०१२/२२३१, दिनांक २३.०४.२०१२ अन्वये पोलीस शिपाई या पदावर निवड झालेल्या उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा त्यांचे प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात पोलीस शिपाई या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास अशा उमेदवाराकडुन प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्यासहीत वसुल करण्यात येईल. प्रशिक्षणावरचा खर्च म्हणुन प्रती महिना रु. २०००/- (प्रती मासीक दोन हजार फक्त) इतका प्रशिक्षणावरील खर्च वसुल करण्यात येईल. तसेच शासकिय सेवेचा राजीनामा स्विकारण्याच्या संबंधात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र. ३३/९२/८, दिनांक ०२ डिंसेबर १९९७ मधील सर्वसाधारण मार्गदर्शक सुचनेप्रमाणे तरतुदी बंधनकारक राहतील.

११) पोलीस शिपाई पदावर नियुक्त केलेल्या कर्मचारी त्याच्या नियुक्तीच्या पोलीस घटकातुन इतर पोलीस घटकात बदलीसाठी गृहविभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५ ब दिनांक २६ ऑक्टोबर २०१७ मधील तरतुदी लागु राहतील.

१२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर २०११ अन्वये सरळसेवा भरतीमध्ये ज्या उमेदवाराची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या जागेवर झाली आहे, अशा उमेदवारास, त्याच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहुन तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर, अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडुन करुन घेणे आवश्यक आहे. उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी ऑनलाईन प्रस्ताव संबंधीत जात पडताळणी समिती कडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीची छायांकित प्रत या कार्यालयात सादर करावी. जात पडताळणी समितीने आपले जात प्रमाणपत्र अवैध ठरविले, तर आपणांस दिलेली नियुक्ती त्वरीत रद्द करण्यात येईल आणि आपले विरुध्द महाराष्ट्र अनुसुचीत जाती, अनुसुचीत जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यातील तरतुदीनुसार त्वरीत कार्यवाही करण्यात येईल.

१३) पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या या उमेदवारांना मुंबई पोलीस अधिनियम १९५१, मुंबई पोलीस मॅन्युअल १९५९, मुंबई पोलीस (शिस्त व अपील) नियम १९५६ व राज्य शासनाने वेळोवेळी विहीत केलेले अन्य नियम लागु होतील.

१४) पोलीस शिपाई पदावर नियुक्त उमेदवारांची सेवाज्येष्ठता महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली २०२१ अन्वये निश्चीत करण्यात येईल.

१५) शासकिय सेवेत रुजु झाल्यानंतर उमेदवारास भारतीय संविधानाप्रती निष्ठा व गोपनियतेची शपथ घ्यावी लागेल.

१६) आपणांस नियुक्ती आदेश मिळाल्यानंतर सर्व प्रकारचा पत्रव्यवहार करतांना पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर येथील नियुक्ती आदेशात नमुद करण्यात आलेल्या बक्कल क्रमांकाचा उल्लेख व वापर करण्यात यावा.

१७)	आदेश प्राप्त होताच आपण राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे तात्काळ हजर व्हावे. यापुर्वी कोणत्याही सेवेत नोकरी करीत असल्यास नोकरी सोडण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीकरीता पुरेसा अवधी म्हणुन १० दिवस कालावधी देण्यात येईल. सदरचा विहीत मुदतीचा कालावधी संपल्यानंतर आपणांस पोलीस शिपाई पदावर रुजु करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

१८) उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी रुजु होण्यासाठी करावी लागणाऱ्या प्रवासासाठी प्रवास भत्ता मिळणार नाही.

**२.पोआअ/आस्था-प्रलि/चापोशि भरती २०२१-नियुक्ती/५६४९/२०२३ अमरावती शहर**
**दिनांक १६/०५/२०२३**

## <u>नियुक्ती आदेश</u>

महाराष्ट्र राज्य पोलीस दलात पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवर चालक पोलीस शिपाई यांची रिक्त पदे भरण्याकरीता महाराष्ट्र पोलीस शिपाई चालक सेवाप्रवेश नियम २०१९ मधील तरतुदीनुसार **"चालक पोलीस शिपाई" (गट-क, अराजपत्रीत)** पदाची भरती प्रक्रिया राबविण्यात आली आहे. पोलीस शिपाई चालक भरती २०२१ मध्ये पोलीस शिपाई चालक पदावर निवड झालेले खालील नमुद उमेदवार चारीत्र पडताळणी व वैद्यकिय तपासणीमध्ये पात्र ठरल्याने त्यांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गामध्ये व महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, २०१९ अन्वये वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर एस-७ :- २१७००-६९१००, अधीक विशेष वेतन रुपये ७५०/- (महागाई भत्ता व लागु असलेले इतर भत्त्यासह) मध्ये **"चालक पोलीस शिपाई"** पदी मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१, प्रशासन) मधील नियम ३३ मध्ये असलेल्या अधिकारानुसार **निव्वळ तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन नियुक्ती देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | चेस्ट क्रमांक | नियुक्तीचा प्रवर्ग | बक्कल क्रमांक | नियुक्ती पासुन देय वेतन | नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.धनराज वसंतराव बिक्कड | २६ | गुणवत्तेनुसार खुला | ०७ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पो.मुख्यालय, अमरावती शहर |
| २. | श्री.युवराज रमेश चव्हाण | १११ | गुणवत्तेनुसार खुला | २५ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पो.मुख्यालय, अमरावती शहर |
| ३. | श्री.देवानंद माधव घुगे | १९९ | गुणवत्तेनुसार खुला | ३२ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पो.मुख्यालय, अमरावती शहर |
| ४. | श्री.लंकेश प्रकाश चव्हाण | २५५ | गुणवत्तेनुसार खुला | ७१ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पो.मुख्यालय, अमरावती शहर |
| ५. | कु. वैष्णवी पांडुरंगजी येडे | ८१ | गुणवत्तेनुसार खुला/महिला | ९८ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पो.मुख्यालय, अमरावती शहर |
| ६. | कु.खुशी प्रेमचंद चौहान | ८२ | गुणवत्तेनुसार खुला/महिला | १२८ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पो.मुख्यालय, अमरावती शहर |
| ७. | कु.सोनल दिलीपराव लव्हाळे | ८९ | गुणवत्तेनुसार खुला/महिला | १३३ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पो.मुख्यालय, अमरावती शहर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८. | श्री.गोपाल लक्ष्मणराव झास्कर | २२२ | गुणवत्तेनुसार खुला/माजी सैनिक | १३६ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पो.मुख्यालय, अमरावती शहर |
| ९. | श्री.अमोल बबन जाधव | २४६ | अनु.जाती | १६६ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पो.मुख्यालय, अमरावती शहर |
| १०. | कु.प्रतिक्षा गणेश इंगोले | ८३ | अनु.जाती/ महिला | १९४ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पो.मुख्यालय, अमरावती शहर |
| ११. | श्री.प्रफुल नामदेवराव सोळंके | ४२४ | अनु.जमाती | २१८ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पो.मुख्यालय, अमरावती शहर |
| १२. | श्री.निलेश सोपान शेळके | १२ | अनु.जमाती | २३२ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पो.मुख्यालय, अमरावती शहर |
| १३. | श्री.अशोक गिरीधरराव खंगार | १९६ | भटक्या जमाती-ब | २७० | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पो.मुख्यालय, अमरावती शहर |
| १४ | श्री.विक्रम गणेश लव्हाटे | २३८ | भटक्या जमाती-क | ३२४ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पो.मुख्यालय, अमरावती शहर |
| १५ | श्री.गोकुल संजयराव दारोकार | १९३ | इतर मागास वर्ग | ३३० | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पो.मुख्यालय, अमरावती शहर |
| १६ | श्री.सचिन कैलास काळे | २४९ | आर्थिक दुर्बल घटक | ३३८ | रु. २१७०० + वि.वे. रु. ७५०/- | पो.मुख्यालय, अमरावती शहर |

**सदर नियुक्ती खालील अटी व शर्तीच्या अधिन राहील:-**

१) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मुंबई शासन आदेश क्रमांक एसएमटीएस-०९०९/१५३२/प्र.क्र. ५९२/पोल ४, दि. ०६.०९.२०१९ अन्वये निर्गमीत केलेल्या महाराष्ट्र पोलीस शिपाई चालक सेवाप्रवेश नियम २०१९ मधील मधील उमेदवारांची नियुक्ती पुर्णत: अस्थायी स्वरुपाची असुन उमेदवारांची अर्हता व उमेदवाराने सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या आधारे पोलीस शिपाई चालक पदावर निवड करण्यांत आलेली आहे. त्यामुळे पोलीस भरतीच्या वेळी सादर केलेली विविध प्रमाणपत्रे, गुणपत्रिका बनावट/खोटे असल्याचे भविष्यात आढळून आल्यास तसेच कोणतीही अनर्हता आढळून आल्यास शासकीय सेवा पुर्व सूचना न देता किंवा कोणतेही कारण न दर्शविता समाप्त करण्यांत येईल. याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ तरतुदीनुसार **राज्य शासनाच्या सेवेत दिनांक ०१ नोव्हेंबर २००५ किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना नविन "परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना आता सुधारीत राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना" लागु ठरेल.** मात्र, सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना १९९८ लागु होणार नाही. तसेच वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४ दिनांक ३१ मार्च २०२३ तरतुदीनुसार परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचा-याचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यु उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृति उपदान तसेच शासन सेवेतुन निवृत्त होणा-या कर्मचा-यांना सेवा उपदान अनुज्ञेय राहील.

३) पूर्व चारित्र व वर्तणुक पडताळणी बाबत भरुन दिलेला साक्षांकन फॉर्म मध्ये खोटी माहिती पुरविलेली आहे किंवा वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडवुन ठेवल्याचे सेवाकाळात कधीही निदर्शनास आल्यास तसेच आपले विरुध्द फौजदारी खटले न्याय प्रविष्ठ आहेत किंवा नैतीक अंध:पतनाच्या गुन्हयात आपणास दोषी ठरवुन न्यायालयाने शिक्षा दिल्याचे किंवा पोलीस सेवेत अभियोग्य नसल्याचे आढळुन आल्यास किंवा इतर मार्गाने निदर्शनास आल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता आपली पोलीस शिपाई चालक पदावरील सेवा समाप्त करण्यात येईल व आपणाविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

४) तुम्हास देण्यात आलेली नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या व हंगामी स्वरुपाची असुन तुम्हास कोणत्याही प्रकारची पुर्वसुचना अथवा नोटीस न देता सेवेतुन कमी करण्यात येईल.

५) चालक पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारास या पदासाठी विहीत केलेले मुलभुत प्रशिक्षण पुर्ण करावे लागेल व संबंधीत परिक्षा चार संधीमध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल. जर चार संधीमध्ये आपण परिक्षा उत्तीर्ण झाला नाही तर आपली सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही. वार्षिक वेतनवाढ रोखलेले उमेदवार संबंधीत परिक्षा विहीत संधित उत्तीर्ण झ ााल्यास, राखुन ठेवलेली वेतनवाढ त्यास देय होईल. परंतु वेतनवाढ रोखुन धरल्यामुळे देय होणारी थकबाकी मिळण्याचा हक्क असणार नाही.

६) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मुंबई शासन आदेश क्रमांक एसएमटीएस-०९०९/१५३२/प्र.क्र. ५९२/पोल-४, दि. ०६.०९.२०१९ अन्वये निर्गमीत केलेल्या महाराष्ट्र पोलीस शिपाई चालक सेवाप्रवेश नियम २०१९ मधील तरतुदीनुसार चालक पोलीस शिपाई या पदावर नियुक्त उमेदवारांनी जड वाहन (HGV) आणि जड वाहन प्रवाशी (HPMV) चालविण्याचा परवाना नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन पुढील ०५ वर्षात प्राप्त करणे बंधनकारक राहील. अन्यथा, तो पुढील वेतनवाढीस तसेच पदोन्नतीकरीता पात्र राहणार नाही.

७) प्रशिक्षणाच्या कालावधीत शिस्त ही अत्यंत उच्च दर्जाची राहील. वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन काटेकोरपणे होईल याची दक्षता बाळगावी. प्रशिक्षण कालावधीत गैरशिस्तीचे वर्तन किंवा असभ्य वर्तन आढळुन आल्यास त्वरीत सेवेतुन कमी करण्यात येईल. प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारच्या रजा मिळणार नाही तसेच सक्षम अधिकाऱ्यांच्या परवानगी शिवाय मुख्यालय परिसर सोडुन बाहेर जाता येणार नाही.

८) हिंदी आणि मराठी भाषा परिक्षेसंबंधीच्या नियमावलीनुसार जर त्यांनी या परिक्षा अगोदरच उत्तीर्ण केल्या नसतील किंवा त्या उत्तीर्ण होण्यापासुन त्यांना सुट मिळाली नसेल तर त्यांनी एतदर्थ मंडळाची मराठी / हिंदी विषयांची परिक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. अन्यथा तद्नंतर त्यांच्या पुढील वेतनवाढी रोखुन ठेवण्यात येईल.

९) शासन अधिसुचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र. (१७/२०००)/बारा, दिनांक २८ मार्च २००५ चे महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ तरतुदीनुसार आपणास दिनांक २८ मार्च २००५ रोजी किंवा त्यानंतर हयात असलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत नमुना-अ नुसार विहीत प्रतिज्ञापन भरुन दयावे लागेल तसेच हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक आढळुन आल्यास राज्य शासकिय सेवेच्या पदासाठी अनर्ह ठरविण्यात येवुन सेवेतुन कमी करण्यात येईल.

१०) गृह विभाग शासन पत्र क्र. पीएसबी-०३११/प्र.क्र.५२१/पोल-५ अ, दिनांक २६.०९.२०११ व अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. प्रशि/पोशि-भरती/प्रशि-खर्च वसुली/२०१२/२२३१, दिनांक २३.०४.२०१२ अन्वये चालक पोलीस शिपाई या पदावर निवड झालेल्या उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा त्यांचे प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात चालक पोलीस शिपाई या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास अशा उमेदवाराकडुन प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्यासहीत वसुल करण्यात येईल. प्रशिक्षणावरचा खर्च म्हणुन प्रती महिना रु. २०००/- (प्रती मासीक दोन हजार फक्त) इतका प्रशिक्षणावरील खर्च वसुल करण्यात येईल. तसेच शासकिय सेवेचा राजीनामा स्विकारण्याच्या संबंधात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र. ३३/९२/८, दिनांक ०२ डिंसेबर १९९७ मधील सर्वसाधारण मार्गदर्शक सुचनेप्रमाणे तरतुदी बंधनकारक राहतील.

११) पोलीस शिपाई चालक या पदाकरीता निवड करण्यात आलेले पोलीस अंमलदार हे कार्यकारी पोलीस दलात बदलीसाठी पात्र असणार नाही. मात्र, हे उमेदवार विनंतीनुसार जिल्हयाच्या बाहेर फक्त इतर पोलीस घटकात त्याच पदावर बदलीस पात्र ठरतील.

१२) पोलीस शिपाई पदावर नियुक्त केलेल्या कर्मचारी त्याच्या नियुक्तीच्या पोलीस घटकातुन इतर पोलीस घटकात बदलीसाठी गृहविभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५ ब दिनांक २६ ऑक्टोंबर २०१७ मधील तरतुदी लागु राहतील.

१३) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर २०११ अन्वये सरळसेवा भरतीमध्ये ज्या उमेदवाराची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या जागेवर झाली आहे, अशा उमेदवारास, त्याच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहुन तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर, अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडुन करुन घेणे आवश्यक आहे. उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी ऑनलाईन प्रस्ताव संबंधीत जात पडताळणी समिती कडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीची छायांकित प्रत या कार्यालयात सादर करावी. जात पडताळणी समितीने आपले जात प्रमाणपत्र अवैध ठरविले, तर आपणांस दिलेली नियुक्ती त्वरीत रद्द करण्यात येईल आणि आपले विरुध्द महाराष्ट्र अनुसुचीत जाती, अनुसुचीत जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यातील तरतुदीनुसार त्वरीत कार्यवाही करण्यात येईल.

१४) चालक पोलीस शिपाई या पदावर नियुक्त झालेल्या उमेदवारांना मुंबई पोलीस अधिनियम १९५१, मुंबई पोलीस मॅन्युअल १९५९, मुंबई पोलीस (शिस्त व अपील) नियम १९५६ व राज्य शासनाने वेळोवेळी विहीत केलेले अन्य नियम लागु होतील.

१५) चालक पोलीस शिपाई पदावर नियुक्त उमेदवारांची सेवाज्येष्ठता महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली २०२१ अन्वये निश्चीत करण्यात येईल.

१६) शासकिय सेवेत रुजु झाल्यानंतर उमेदवारास भारतीय संविधानाप्रती निष्ठा व गोपनियतेची शपथ घ्यावी लागेल.

१७) आपणांस नियुक्ती आदेश मिळाल्यानंतर सर्व प्रकारचा पत्रव्यवहार करतांना पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर येथील देण्यात आलेल्या बक्कल क्रमांकाचा उल्लेख व वापर करण्यात यावा.

१८) आदेश प्राप्त होताच आपण राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे तात्काळ हजर व्हावे. यापुर्वी कोणत्याही सेवेत नोकरी करीत असल्यास नोकरी सोडण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीकरीता पुरेसा अवधी म्हणुन १० दिवस कालावधी देण्यात येईल. सदरचा विहीत मुदतीचा कालावधी संपल्यानंतर आपणांस चालक पोलीस शिपाई पदावर रुजु करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

१९) उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी रुजु होण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रवासासाठी प्रवास भत्ता मिळणार नाही.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

**निरंक**

## भाग-३

## वेतन/वेतन संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

**१.पोआअ/पशा-५/घर भाडे भत्ता/५६९१/२०२३ अमरावती शहर दिनांक १७/०५/२०२३**

### आदेश

पोलीस आयुक्त अमरावती शहर या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी व मंत्रालयीन कर्मचारी यांना नियमानुसार भाडेमाफ निवासस्थानाची सोय आहे. त्यांचे शहरा मध्ये स्वत:चे घर असल्यामुळे, भाडयाने राहत असल्याने व शासकीय निवासस्थान उपलब्ध/रिक्त नसल्याने शासन निर्णय वित्त विभाग नुसार ज्यावेळी सातव्या वेतन आयोगानुसार अनुज्ञेय केलेला महागाई भत्ता हा २५ टक्याची मर्यादा ओलांडल्याने खालील नमुद कर्मचारी यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे त्यांना दिनांका पासुन १८% व पोस्टे नांदगावपेठ, वलगाव व भातकुली येथील नेमणुकस असलेले पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना ९% घरभाडे भत्ता व मंजुर करण्यात येत आहे.

तसेच शासकीय निवासस्थान उपलब्ध झाल्यावर त्यांचे घरभाडे भत्ता बंद करण्यात येईल या अटीवर खालील पोलीस कर्मचारी यांना घरभाडे भत्ता मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम/ब.क्र./नाव | नेमणुक | घरभाडे भत्ता टक्केवारी | घरभाडे मंजुर कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | पोशि/६९४ राहुल खंडारे | पोलीस मुख्यालय | १८% | १९/११/२०२१ |
| २ | पोलिस निरीक्षक/सुरेंद्र अहेरकर | पो.स्टे.वलगाव | ९% | १०/०२/२०२२ |
| ३ | पोहवा/१००९ प्रकाश गिरी | शवाशा | १८% | ०५/०३/२०२२ |
| ४ | सपानि/मनोजकुमार मानकर | पो.स्टे.राजापेठ | १८% | ११/०९/२०२१ |

**(किशोर शेंडे)**
प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त, अमरावती शहरकरीता

प्रति,
पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस